## आदेश

सदर अर्ज कौटुंबिक हिंसाराचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम कलम २३ नुसार दरमहा अंतरिम आदेश म्हणून आर्थिक मदत मिळणेसाठी दाखल करणेत आलेला आहे.

०२. अर्ज, शपथपत्र, मूळ अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

०४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तिचा व सामनेवाला क्र.१ चा विवाह दि.२३/०४/२०१७ रोजी झाला. लग्नानंतर अर्जदार सामनेवाले यांचेकडे नांदावयास गेली असता सुरुवातीपासुनच सामनेवाला क्र. १ याचे अर्जदारासोबत वागणे बरोबर नव्हते. सामनेवाला क्र.१ याचा फॅब्रीकेशनचा पार्टनरशिपचा व्यवसाय असुन त्यास दारु पिण्याचे व इतरही व्यसन होते. तो दिवसरात्र दारुच्या नशेत असतो. काहीही कारण नसतांना तो अर्जदारासोबत भांडणतंटा व अश्लील शिवीगाळ करुन जिवघेणी मारहाण करीत असे. अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेवुन तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत असे.

०५. अर्जदाराचे पुढे प्रकरण असे की, सामनेवाला क्र.१ याचे मुंबई येथील कल्पना नावाच्या स्त्रीसोबत प्रेमसंबंध असल्यामुळे तो दोन—तीन दिवस तिचेकडे जावुन राहत असे. अर्जदाराविरुध्द कुटुंबातील इतर व्यक्ती कानभरणी करत असे. या संदर्भात अर्जदाराने महीला समुपदेशन केंद्र, मालेगाव यांच्याकडे डब्ल्यु. सी. एम. ८९ चा दि.२२/०५/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. परंतु भावी आयुष्याचा व लहान अपत्यांच्या हिताचा विचार

करुन अर्जदार ही दि.०२/०६/२०१९ रोजी सामनेवालाकडे नांदावयास गेली. मात्र सामनेवालांच्या वर्तवणुकीत कोणताही बदल झाला नाही. सामनेवाला क्र.१ हा त्याची प्रेयसी कल्पना हीच्या आहारी जावुन अर्जदाराचा छळ करुन पैशांची मागणी करीत असे.

०६. अर्जदाराचे पुढे प्रकरण असे की, अर्जदार ही सात महीन्यांची गरोदर असतांना बाळंतपणाचे निमित्त करुन सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ ला तिच्या माहेरी आणुन सोडले. अर्जदार बाळंतीन होवुन मुलगी तनिशा उर्फ अनवीशा हिचा जन्म झाला. पुन्हा मुलगीच झाल्यामुळे सामनेवाले हे अर्जदार व तिच्या लहान मुलीस बघण्यास व अर्जदारास नांदणेस घेवुन जाणेसाठी आले नाही. सामनेवाले यांचेकडुन होत असलेल्या त्रासाबाबत अर्जदाराने दि. २५/०८/२०२० रोजी महीला समुपदेशन केंद्र, मालेगाव यांच्याकडे तक्रार अर्ज दिला होता. संसार करण्याची इच्छा असल्याने समजुतीचे बोलणे व लेख होवुन अर्जदार क्र.१ ही इतर अर्जदारांसह सामनेवाले यांचेकडे दि.२९/०९/२०२० रोजी नांदावयास गेली परंतु काही दिवस कसेबसे नांदविल्यानंतर सामनेवाला क्र. १ हा पुन्हा अर्जदारास म्हणत असे की, तु मला आवडत नाही, माझे दुसरे मुलीसोबत प्रेमसंबंध आहे. सामनेवाले हे अर्जदारास नवीन दुकान टाकणेसाठी पंचवीस हजार रुपयांची मागणी करीत असे. शेवटी दि.०९/०९/२०२१ रोजी अर्जदाराच्या अंगावरील सर्व चिजवस्तु काढुन घेवुन रात्री घरातुन हाकलुन दिले. म्हणुन नाईलाजास्तव अर्जदार ही दोन्ही लहान अपत्यांसह माहेरी राहत आहे.

०७. अर्जदारांचे पुढे प्रकरण असे की, अर्जदार क्र.१ हीचेकडुन काहीही कामधंदा होत नाही. ती स्वत:चा व अर्जदार क्र.२ व ३ यांची उपजिवीका भागविण्यास पुर्णपणे असमर्थ आहे. याउलट सामनेवाला क्र.१ हा धडधाकट आहे. सामनेवाले यांची मौजे सुकेणे येथे एकत्रीत कुटुंबाची शेती असुन सदर उत्पन्नातुन सामनेवाले यांना खर्च वजा जाता दरवर्षी सुमारे १० ते १२ लाख

रुपयांचे उत्पन्न मिळते. तसेच सामनवोला क्र.१ याचा नाशिक येथे वेल्डींग वर्कशॉपचा व्यवसाय आहे. सदर व्यवसायातुन त्यास खर्च वजा जाता दरमहा सुमारे ५० ते ६० हजार रुपये उत्पन्न मिळते. सामनेवाली क्र.२ हीस दरमहा सुमारे २५ ते ३० हजार रुपये पेन्शन मिळते. सामनेवाला क्र.३ हा ॲटो एजंटचा व्यवसाय करत असुन त्यापासुन त्यास दरमहा सुमारे ३५ ते ४० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र.१ याचेवर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. शेवटी अर्जदाराने स्वत:करीता दरमहा रक्कम रुपये २०,०००/— व अर्जदार क्र.२ व ३ यांचेकरीता प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १०,०००/— मिळणेकरिता अंतरिम आदेशाची विनंती केली.

०८. सामनेवालाने नि.क्र.१७ वर जबाब दाखल करुन अर्जदारांचे व त्यांचे नातेसंबंध मान्य केलेले आहेत परंतु इतर संपुर्ण मजकुर नाकारलेला आहे. सामनेवाला क्र.१ याने त्याचे जबाबात त्यांचा कोणताही फॅब्रीकेशनचा व्यवसाय नसुन ते फॅब्रीकेशन व्यवसायात कामगार म्हणुन काम करत आहे. अर्जदार क्र.१ च्या स्वभावामुळे त्यांना वारंवार काम सोडुन घरी यावे लागते. तसेच काम कायमस्वरुपी नसल्याने त्यांना मालक सांगेल तेथे वेळोवेळी जावे लागते. सामनेवाला क्र.१ यांचेवर अर्जदार क्र.१ हया संशय घेत असुन त्यांचे परस्त्रियांशी अनैतीक संबंध असल्याचे आरोपी करीत असते असे कथन केले आहे. सामनेवाले यांनी खर्चासह अर्ज नामंजुर करणेची विनंती केली.

०९. अर्जदार व सामनेवाला यांचेमधील नातेसंबंधाबाबत वाद नाही. अर्जाच्या पुष्ठयर्थ शपथपत्र दाखल आहे. अर्ज आणि शपथपत्रातील कथने यावरुन अर्जदारास सामनेवाला यांचे कडून कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ ही इतर अर्जदारांसह तिचे माहेरी राहत आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हीस ती माहेरी

असलेपासुन कोणतेही आर्थिक सहाय्य केले नसल्याचे अभिलेखावरुन स्पष्ट होत आहे. अर्जदारास प्रथमदर्शनी कोणतेही उत्पन्नाचे साधन दिसून येत नाही. सामनेवाला क्र.१ हा पती या नात्याने सद्यस्थितीत अर्जदारास आर्थिक मदत देण्यास जबाबदार आहे. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढणेस नक्कीच काही अवधी लागणार आहे. अर्जदाराने सामनेवाले यांचे उत्पन्न दाखविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे सामनेवाला क्र.१ याने देखील त्याचे उत्पन्न आणि दायित्व दाखविणारे प्रतिज्ञापत्र संधी देवुनही न्यायपटलावर दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीमध्ये सामनेवाला क्र. १ यास उत्पन्नाचे साधन आहे असे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. प्रस्तुत प्रकरण विचारात घेता अर्जदार क्र.१ हीस दरमहा रक्कम रूपये २,०००/— (रूपये दोन हजार मात्र) तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ५००/— (प्रत्येकी रूपये पाचशे मात्र), असे एकुण दरमहा रक्कम रूपये ३,०००/— (रूपये तीन हजार मात्र) मंजुर करणे न्याय व योग्य आहे. सबब, खालील आदेश पारीत करणेत येत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार क्र.१ हीस दरमहा रक्कम रूपये २,०००/— (रूपये दोन हजार मात्र) तसेच अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ५००/— (प्रत्येकी रूपये पाचशे मात्र), असे एकुण दरमहा रक्कम रूपये ३,०००/— (रूपये तीन हजार मात्र) सदर अर्ज दाखल तारखेपासून सदरच्या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम आदेश म्हणुन द्यावेत.

दिनांक ०४/०४/२०२४ (सु. व्ही. लाड)
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, नांदगाव